महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा, संयुक्त (मुख्य) परीक्षा २०२५
दि. १० मे, २०२६ **2025** पेपर क्रमांक - १

**Z24**

संच क्र. **A**

# प्रश्नपुस्तिका - I
# मराठी व इंग्रजी

| प्रश्नपुस्तिका क्रमांक/Booklet No. |
|---|
| |

**एकूण प्रश्न : 100**

वेळ : 1 (एक) तास

**एकूण गुण : 200**

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 100 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

परीक्षा-क्रमांक [ | | | | | | | | ]
केंद्राची संकेताक्षरे ↑ शेवटचा अंक ↑

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तर-क्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्न-क्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नांकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही. एकापेक्षा जास्त उत्तरे नमूद केल्यास ते उत्तर चुकीचे धरले जाईल व त्या चुकीच्या उत्तराचे गुण वजा केले जातील.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चुकीच्या उत्तरासाठी 25% किंवा 1/4 गुण वजा/कमी करण्यात येतील."**

**पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये**

### ताकीद

**ह्या प्रश्नपुस्तिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. स्पर्धा परीक्षा घेण्यासाठी, प्राधिकृत केलेली, नेमलेली किंवा कर्तव्ये सोपविलेली कोणतीही व्यक्ती, प्रश्नपुस्तिका उघडण्यासाठी व वितरित करण्यासाठी निश्चित केलेल्या वेळेपूर्वी अशी प्रश्नपुस्तिका किंवा तिचा कोणताही भाग किंवा तिची प्रत उघडणार नाही, फोडणार नाही किंवा ताब्यात घेणार नाही किंवा पाहणार नाही किंवा सोडविणार नाही किंवा सोडविण्यास सहाय्य करणार नाही; असे केल्यास "महाराष्ट्र स्पर्धा परीक्षा (अनुचित मार्गांस प्रतिबंध) अधिनियम 2024" मधील तरतुदीनुसार सदर व्यक्ती तीन वर्षांपेक्षा कमी नसेल परंतु, जी पाच वर्षांपर्यंत वाढविता येईल इतक्या मुदतीची कारावासाची शिक्षा आणि दहा लाख रुपयांपर्यंतच्या द्रव्यदंडास पात्र होईल. तसेच ह्या प्रश्नपुस्तिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरुद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा.**

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

1. पुढीलपैकी कोणता शब्द तद्भव नाही ?
(1) ऊन (2) पाऊस (3) तहान (4) झाड

2. व्यंग्यार्थ म्हणजे :
(1) मूळ अर्थ आहे तसाच राहून दुसरा अर्थ सूचित
(2) व्यंगावर आधारित अर्थ
(3) अप्रकट होणारा अर्थ
(4) रुढ अर्थ

3. धातुंना कृत् प्रत्यय जोडून जेव्हा शब्द तयार होतात तेव्हा त्यांना काय म्हणतात ?
(1) तद्धिते (2) कृदन्ते (3) नामसाधित (4) प्रत्यय

4. शाळांतून सहशिक्षण दिले पाहिजे हा मुद्दा आता वादाचा नाही. या वाक्यातील उद्देश्य कोणते ?
(a) शाळांतून (b) सहशिक्षण (c) मुद्दा (d) वादाचा
**पर्यायी उत्तरे :**
(1) (a) फक्त बरोबर बाकी सर्व चूक (2) (b) व (c) बरोबर (a) व (d) चूक
(3) (c) फक्त बरोबर बाकी सर्व चूक (4) (a) व (c) बरोबर (b) व (d) चूक

5. पुढील विरुद्ध अर्थी शब्दाची चुकीची जोडी कोणती ?
(1) भाविक × बुद्धिप्रामाण्यवादी (2) दिव्य × पार्थिव
(3) खेद × मोद (4) भ्रष्टाचार × खाबुगिरी

6. पुढीलपैकी मराठीतील अव्ययीभाव सामासिक शब्द कोणता ?
(1) प्रतिदिवशी (2) दररोज (3) प्रतिदिन (4) आमरण

7. काल फार पाऊस पडला. या वाक्याचा अर्थानुसार प्रकार कोणता ?
(a) विधानार्थी – (होकारार्थी) (b) संकेतार्थी – (होकारार्थी)
(c) विध्यर्थी – (होकारार्थी) (d) उद्गारार्थी – (होकारार्थी)
**पर्यायी उत्तरे :**
(1) (a) फक्त बरोबर बाकी सर्व चूक
(2) (b) फक्त बरोबर बाकी सर्व चूक
(3) (a) आणि (c) फक्त बरोबर बाकी सर्व चूक
(4) (d) फक्त बरोबर बाकी सर्व चूक

**8.** 'पन्नास हजाराच्या पुढे महिन्याचा खर्च जायला नको.' या वाक्यातील अधोरेखित क्रियापदाचा प्रकार ओळखा.

(1) प्रायोजक (2) सिद्‌ध (3) विधानपूरक (4) शक्य

**9.** दर्शक सर्वनामे असलेले शब्दगटांचे अचूक पर्याय ओळखा.

(a) कोण, काय, का, कसे. (b) हा, ह्या, ही, ते.

(c) जी, जो, ज्या, जे. (d) त्या, ती, हे, तो.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) व (c) बरोबर (b) व (d) चूक आहे. (2) (b) व (d) बरोबर (a) व (c) चूक आहे.

(3) (a), (c) व (d) बरोबर (b) फक्त चूक आहे. (4) (b), (c) व (d) बरोबर (a) फक्त चूक आहे.

**10.** वाक्याचे अर्थानुसार प्रकार व त्याचे उदाहरणे यांच्या योग्य जोड्या जुळवा.

(a) स्वार्थी (i) तुम्ही अभ्यास करावा.

(b) आज्ञार्थी (ii) मुले अभ्यास करतात.

(c) विध्यर्थी (iii) मुलांनो, सर्वजण रांगेत उभे राहा.

(d) संकेतार्थ (iv) निमंत्रण आले तर मी येईन.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a)-(ii), (b)-(iii), (c)-(i), (d)-(iv)
(2) (a)-(iv), (b)-(ii), (c)-(i), (d)-(iii)
(3) (a)-(i), (b)-(ii), (c)-(iii), (d)-(iv)
(4) (a)-(ii), (b)-(i), (c)-(iv), (d)-(iii)

**11.** (a) गुरूजी म्हणाले.

(b) प्रत्येकाने नियमितपणे शाळेत यावे.

या वाक्यांचे मिश्रवाक्य ओळखा.

(1) गुरूजी म्हणाले म्हणून प्रत्येकाने नियमितपणे शाळेत यावे.

(2) गुरूजी म्हणाल्यामुळे प्रत्येकाने नियमितपणे शाळेत यावे.

(3) गुरूजी म्हणाले आता प्रत्येकाने नियमितपणे शाळेत यावे.

(4) गुरूजी म्हणाले, की प्रत्येकाने नियमितपणे शाळेत यावे.

**12.** खालीलपैकी अनिश्चित संख्या विशेषणांचा गट ओळखा.

(1) चौथा, साठावे, पहिला (2) दसपट, दुहेरी, द्विगुणीत

(3) इत्यादी, थोडी, काही (4) एकेक, दहा-दहा, वीस-वीस

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

**13.** मला हे काम करवते. या वाक्याचा प्रयोग ओळखा.

(1) शक्य कर्मणी (2) कर्मणी (3) समापन कर्मणी (4) गौण कर्तृक कर्मणी

---

**14.** रचनेनुसार वाक्याचे प्रकार ओळखा.

(a) तानाजी लढता लढता मेला. – केवल वाक्य
(b) जे चकाकते, ते सोने नसते. – मिश्र वाक्य
(c) आकाशात जेव्हा ढग जमतात, तेव्हा मोर नाचू लागतात. – संयुक्त वाक्य
(d) आम्ही जातो आमुच्या गावा. – केवल वाक्य

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a), (b) आणि (c) बरोबर (2) फक्त (a), (b) आणि (d) बरोबर
(3) फक्त (a), (d) आणि (c) बरोबर (4) फक्त (a) आणि (c) बरोबर

---

**15.** काळा चोर रस्त्यातून जोराने धावत होता. या वाक्याचे वाक्य पृथक्करण केल्यास उद्देश्यविस्तार व विधेयविस्तार अचूक असलेला पर्याय ओळखा.

| | उद्देश्यविस्तार | विधेयविस्तार |
|---|---|---|
| (a) | काळा | रस्त्यातून |
| (b) | चोर | धावत होता. |
| (c) | काळा चोर | जोराने धावत होता. |
| (d) | काळा | जोराने |

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) व (b) बरोबर (c) व (d) चूक (2) (a) फक्त बरोबर बाकी सर्व चूक
(3) (c) फक्त बरोबर बाकी सर्व चूक (4) (a) व (d) बरोबर (b) व (c) चूक

---

**16.** वाक्प्रचार व त्याचा अर्थ यांच्या जोड्या लावा.

| | 'अ' गट | | 'ब' गट |
|---|---|---|---|
| (a) | जीव मेटाकुटीस येणे | (i) | मायेने सांभाळणे |
| (b) | जीव भांड्यात पडणे | (ii) | काळजी दूर होणे |
| (c) | जिवापाड जपणे | (iii) | खूप काळजी वाटणे |
| (d) | जिवाला घोर लागणे | (iv) | वैतागून जाणे |

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a)-(iv), (b)-(iii), (c)-(ii), (d)-(i)
(2) (a)-(iv), (b)-(ii), (c)-(i), (d)-(iii)
(3) (a)-(iii), (b)-(ii), (c)-(iv), (d)-(i)
(4) (a)-(iii), (b)-(ii), (c)-(i), (d)-(iv)

---

**17.** 'आपल्याला मदत करणाऱ्यालाच त्रास देणे.' या आशयासाठी योग्य म्हणीची निवड करा.

(1) नाकाला मिरच्या झोंबणे
(2) नागीण पोसली पोसणाऱ्यालाच डसली
(3) नाकात वेसण घालणे
(4) नळी फुंकली सोनारे इकडून तिकडे गेले वारे

---

**18.** कोणत्याही क्षेत्रात हळूहळू होणारा इष्ट बदल, या शब्दसमुहासाठी अचूक शब्द असलेला पर्याय कोणता ?

(a) प्रगती (b) क्रांती (c) परिवर्तन (d) उत्क्रांती

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) व (c) बरोबर (b) व (d) चूक आहे.
(2) (b) व (d) बरोबर (a) व (c) चूक आहे.
(3) (a), (b) व (c) बरोबर (d) फक्त चूक आहे.
(4) (d) फक्त बरोबर, बाकी सर्व चूक आहे.

---

**19.** पुढीलपैकी संस्कृत धातुसाधित कोणते ?

(1) गुरू (2) अश्व (3) सावळा (4) मुमुक्षु

---

**20.** थट्टामस्करी, धनदौलत हे पुढीलपैकी कोणत्या प्रकारातील शब्द आहेत ?

(1) अनुकरणवाचक शब्द
(2) अंशाभ्यस्त शब्द
(3) पुनरुक्त शब्द
(4) पूर्णाभ्यस्त शब्द

---

**21.** 'लंकेची पार्वती' या वाक्प्रचाराचा खालीलपैकी कोणता अर्थ आहे ?

(1) मंदोदरी
(2) अंगावर दागिणे असलेली स्त्री
(3) सीता
(4) अंगावर दागिणे नसलेली स्त्री

---

**22.** पुढीलपैकी तत्सम शब्द __________ हा आहे.

(1) लता (2) आरोगण (3) कैवार (4) चहाडी

---

**23.** विशेषणांना प्रत्यय लागून होणाऱ्या भाववाचक नामे व त्यांचे लिंग अचूक असलेला पर्याय ओळखा.

(a) मधुरपण, गोडपणा, गोरेपण, शहाणपण - नपुंसकलिंग
(b) चतुरत्व, मधुरत्व, श्रेष्ठत्व, कवित्व - नपुंसकलिंग
(c) चातुर्य, प्रावीण्य, माधुर्य, लालित्य - स्त्रीलिंग
(d) चतुराई, चपळाई, धुलाई, शिलाई - स्त्रीलिंग

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) व (c) बरोबर (b) व (d) चूक आहे.
(2) (a), (b) व (c) बरोबर (d) फक्त चूक आहे.
(3) (a), (b) व (d) बरोबर (c) फक्त चूक आहे.
(4) सर्व पर्याय बरोबर आहेत.

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

**24.** 'सर्वांनी परमेश्वराची भक्ती करावी' या वाक्यातील प्रयोग ओळखा.

(1) प्रधानकर्तृक कर्मणी प्रयोग (2) समापन कर्मणी प्रयोग

(3) शक्य कर्मणी प्रयोग (4) नवीन कर्मणी प्रयोग

---

**25.** 'घोडा हा एक फार चपळ, उपयोगी व उमदा प्राणी आहे' या वाक्यात किती पूरके आहेत ?

(1) तीन (2) चार (3) एक (4) दोन

---

**26.** पुढीलपैकी शब्दसाधित विशेषण ओळखा.

(1) घरकुल (2) हवेशीर (3) मोकळीक (4) सावधगिरी

---

**27.** घरघर, हळूहळू, शेजारीपाजारी, दगडबिगड हे कोणत्या प्रकारचे शब्द आहेत ?

(1) उपसर्गघटित शब्द (2) सामासिक शब्द

(3) प्रत्ययघटित शब्द (4) अभ्यस्त शब्द

---

**28.** कोणत्या वाक्यप्रकारात एक प्रधानवाक्य व एक गौणवाक्य गौणत्वसूचक उभयान्वयी अव्ययाने जोडले जाते ?

(1) आज्ञार्थी वाक्य (2) केवल वाक्य (3) स्वार्थी वाक्य (4) मिश्र वाक्य

---

**29.** उभयान्वयी अव्यये व त्यांची उदाहरणे यांच्या योग्य जोड्या जुळवा.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | समुच्चयबोधक | (i) | आणि, व, शिवाय |
| (b) | विकल्पबोधक | (ii) | अथवा, वा, किंवा |
| (c) | न्यूनत्वबोधक | (iii) | पण, परंतु, किंतू |
| (d) | परिणामबोधक | (iv) | म्हणून, सबब, याकरिता |

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a)-(i), (b)-(iii), (c)-(ii), (d)-(iv)
(2) (a)-(ii), (b)-(i), (c)-(iv), (d)-(iii)
(3) (a)-(i), (b)-(ii), (c)-(iii), (d)-(iv)
(4) (a)-(iv), (b)-(iii), (c)-(i), (d)-(ii)

---

**30.** 'दुसऱ्यासाठी प्राणाची आहुती देणे' यासाठी योग्य वाक्प्रचार -

(1) जीव कुर्बान करणे (2) जीव गहाण ठेवणे

(3) जीव टांगणीला लावणे (4) जीव तीळतीळ तुटणे

---

**31.** खालीलपैकी कोणत्या नामाचे अनेकवचन होताना मूळ रूपात फरक होत नाही ?

(1) बायको (2) शाळा (3) स्त्री (4) आई

---

**32.** भाषा व परभाषीय शब्द यांच्या योग्य जोड्या जुळवा.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | अरबी | (i) | दलाल, डबा, दादर |
| (b) | गुजराती | (ii) | पोशाख, सामना, अत्तर |
| (c) | कानडी | (iii) | मंजूर, मेहनत, अर्ज |
| (d) | फारसी | (iv) | अक्का, गाजर, चाकरी |

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a)-(iii), (b)-(i), (c)-(iv), (d)-(ii) (2) (a)-(iv), (b)-(iii), (c)-(ii), (d)-(i)
(3) (a)-(ii), (b)-(iv), (c)-(i), (d)-(iii) (4) (a)-(iii), (b)-(ii), (c)-(iv), (d)-(i)

---

**33.** 'तेल गेले तूप गेले हाती धुपाटणे आले.' या म्हणीची समानार्थी म्हण ओळखा.

(1) गाढव गेले आणि ब्रह्मचर्यही गेले. (2) गळ्यात पडले झुंड हसून केले गोड.
(3) खोट्याच्या कपाळी कुऱ्हाडीचा घाव. (4) केले तुका झाले माका.

---

**34.** पुढील विधाने वाचून योग्य पर्याय निवडा.

(a) होकारार्थी वाक्यांना 'करणरूपी वाक्य' म्हणतात.
(b) नकारार्थी वाक्यांना 'अकरणरूपी वाक्य' म्हणतात.
(c) वाक्यातील क्रियापदाच्या अर्थावरून काळाचा बोध होतो त्यास 'विध्यर्थी' वाक्य म्हणतात.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) बरोबर (2) फक्त (a) आणि (c) बरोबर
(3) फक्त (a) आणि (b) बरोबर (4) फक्त (c) बरोबर

---

**35.** 'दहीखाऊ महीखाऊ होणे' या अर्थाचा पुढीलपैकी कोणता वाक्प्रचार आहे ?

(1) हबेलहंडी उडणे (2) हे करू की ते करू (3) क्षुधार्त होणे (4) मुखरस पाघळणे

---

**36.** 'उंटावरचा शहाणा' या वाक्प्रचाराचा खालीलपैकी कोणता अर्थ आहे ?

(1) फार उंची गाठलेला माणूस (2) उंचावरून बोलणारा माणूस
(3) शहाणपणाचा सल्ला देणारा माणूस (4) मूर्खपणाचा सल्ला देणारा माणूस

---

**37.** गावातील सर्व जातीजमातीच्या लोकांनी एकत्र का येऊ नये ?' या प्रश्नार्थक वाक्याचा प्रकार ओळखा.

(1) होकारार्थी (2) विधानार्थी (3) नकारार्थी (4) उद्गारवाचक

---

**38.** लेखनदृष्ट्या शुद्ध शब्द ओळखा.

(1) हिरीरी (2) हिरिरी (3) हिरिरि (4) हीरिरी

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

**39.** "वेळेवर प्रकृतीची काळजी घेतली तर सारं काही ठीक होईल", या वाक्याचा प्रकार ओळखा.

(a) प्रश्नार्थी वाक्य (b) संकेतार्थी वाक्य (c) आज्ञार्थी वाक्य (d) नकारार्थी वाक्य

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) आणि (b) फक्त बरोबर बाकी सर्व चूक
(2) (b) फक्त बरोबर बाकी सर्व चूक
(3) (c) फक्त बरोबर बाकी सर्व चूक
(4) (d) फक्त बरोबर बाकी सर्व चूक

---

**40.** 'दुसऱ्यावर आलेली कठीण परिस्थिती नंतर आपल्यावर येऊ शकते.' यासाठी योग्य म्हणीचा वापर -

(1) पुढच्यास ठेच मागचा शहाणा (2) पुढचे जात्यात मागचे सुपात
(3) पुढे पाठ मागे सपाट (4) पुढे पुढे करणे

---

**41.** पुढीलपैकी फार्सीतून मराठीत आलेला शब्द :

(1) उंडारणे (2) दुकान (3) कुरबूर (4) चिल्लर

---

**42.** 'दृढ' या शब्दाच्या विरुद्धार्थी शब्द वापरलेले अचूक वाक्य कोणते ?

(a) प्रवीण दुर्बळ घटकांना मदत करतो. (b) पाण्याचा प्रवाह अतिशय क्षीण आहे.
(c) हरीण खूप कृश आहे. (d) अनिल खूप रोडका मुलगा आहे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) फक्त बरोबर बाकी सर्व चूक (2) (b) फक्त बरोबर बाकी सर्व चूक
(3) (a) व (c) बरोबर (b) व (d) चूक (4) सर्व पर्याय बरोबर आहेत.

---

**43.** 'नवरा' या शब्दाचा समानार्थी शब्द असलेला अचूक पर्याय कोणता ?

(a) धव (b) भ्रतार (c) कांत (d) राया

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) व (b) बरोबर (c) व (d) चूक आहे. (2) (b), (c) व (d) बरोबर (a) फक्त चूक आहे.
(3) (b) व (c) बरोबर (a) व (d) चूक आहे. (4) (a), (b) व (c) बरोबर (d) फक्त चूक आहे.

---

**44.** पुढीलपैकी __________ हे गणनावाचक विशेषण आहे.

(1) अडीच (2) दुसरा (3) दोघे (4) पन्नासावा

---

**45.** देशी शब्दांचा शब्दगट असलेला अचूक पर्याय ओळखा.

(a) डोके, झाड, बोका, पेशवा (b) गुडघा, दगड, रेडा, खर्च
(c) डोळे, पोट, हाड, लुगडे (d) धोंडा, बाजरी, वांगे, खुळा

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) व (b) बरोबर (c) व (d) चूक (2) (c) व (d) बरोबर (a) व (b) चूक
(3) (a), (b) व (c) बरोबर (d) फक्त चूक (4) सर्व पर्याय बरोबर आहेत.

---

**खालील उतारा वाचून प्रश्न क्र. 46 ते 50 सोडवा.**

आता त्या राष्ट्रांत यंत्रबळे असे दसपट अन्नवस्त्रप्रभृती पदार्थ उत्पन्न होऊनही जर ते त्यातील काही व्यक्तींना मिळाले नाहीत तर तो दोष यंत्राचा का म्हणावयाचा ? पूर्वी मिळत होते त्यापेक्षा दसपट अन्नवस्त्र, त्यापेक्षा कमी काबाडकष्ट जर उत्पादिले जात आहे, तर यंत्राने त्यातील प्रत्येक व्यक्तीस पूर्वीपेक्षा दसपटीने सुखी केले आहे असेच म्हटले पाहिजे, बेकार केले असे नव्हे. येथे यंत्राचे कर्तव्य संपले. दसपटीने अधिक अन्न उत्पादिले असताही काही माणसे इतरांकडून नागवली गेली किंवा दसपट सुखी न होता भिकारी झाली, तर तो दोष समाजरचनेचा म्हटला पाहिजे. ती यंत्रे सामाईक ठेवा, ते यथेच्छ उत्पादिलेले अन्नवस्त्र समान प्रमाणात प्रत्येक व्यक्तीला वाटून द्या, ते कमी लागणारे काबाडकष्ट विशिष्ट वर्गाच्याच डोक्यावर न लादता सर्वांकडून करून घेऊन सर्वांचाच भार हलका करा. पूर्वीपेक्षा रिकाम्या राहणाऱ्या वेळात सर्वांनाच अधिक सुट्ट्या नि कमी श्रम भोगू द्या. काबाडकष्टावाचून वाचलेला नि सक्तीचे काम नसलेला वेळ ज्याला त्याला आपल्या लहरीप्रमाणे काव्यकला, व्यायाम, वाचन, परोपकार, इतर उद्योग, शोधसंशोधन, करमणूक, कसरती, यथाइष्ट तथा घालवू द्या! यंत्रे सारीच कामे करू लागली तर मग मनुष्याने करावयाचे तरी काय ? अशा शंकेने घाबरलेल्यांनी हे ध्यानात धरावे की, मनुष्य जे काबाडकष्ट करतो ते त्यास हवे म्हणून करीत नसतो. यंत्राने काबाडकष्टांची आवश्यकता जितकी कमी होईल तितके मनुष्यास हलकेच वाटेल. बरेच वाटेल. पण यंत्रामुळे काबाडकष्ट टळतात म्हणजे मनुष्याने कोणतेच आवडते कामही करू नये, असा काही यंत्रशास्त्राचा निश्चय नाही! उलट मनुष्य आपल्याला वाटेल ते काम करण्यास वा न करण्यास स्वतंत्र होईल. कारण यंत्राने उत्पादन वाढल्यामुळे आज बळे बळे कराव्याच लागणाऱ्या काबाडकष्टांपासून मनुष्याची यंत्रामुळे झाली तर सोडवणूकच होणारी आहे. त्याचप्रमाणे ज्याला साधी राहणी हवी असेल त्याला देखील यंत्रे काही आडवी येत नाहीत. त्याला हवा तर त्याने पंचा नेसावा, लंगोटी नेसावी. तो मुळीच काही न नेसला तरी देखील यंत्र त्याला बळे बळे वीतभर जरीकाठीचे धोतर काही नेसवीत नाही! तो मठीत लोळो, झोपडीत राहो, फळे खावो, उपास करो! यंत्राने साधी राहणी नाहीशी होऊन ती महागडी होते वा विलासी होते, हे म्हणणे असंमजसपणाचे आहे. यंत्र बिचारे बोलून चालून जड, निर्जीव, इच्छाशून्य, परतंत्र! ते होऊन काही त्याने उत्पादन केलेल्या पदार्थांचा सारा गट्टा कोणत्यातरी एका लाडक्या वर्गास देत नाही, कोणाचा काढून घेत नाही. तेव्हा यंत्रामुळे बेकारी वाढते, साधी राहणी बिघडते, श्रीमंत-भिकारी असा वर्गकलह पेटतो, सारी कामे यंत्रच करू लागले तर मनुष्य रिकामपणाने गंजून, आळसाने गंजून निकम्मी होऊन पडेल; काम करण्याच्या निढळाच्या घामाने मिळविलेली भाकरी खाण्याच्या आनंदास अंतरेल; तो ईंद्रियांचा दुबळा, मनाचा अनुदार, अंगाचा जत्कारू बनेल, आणि यंत्राचाच दास होऊन पडेल! इत्यादी सारी ओरड पूर्णपणे असमंजसपणाची नि भेकडपणाची असून आजच्या समाजरचनेच्या विषमतेचे हे दोष केवळ साहचर्यामुळे हे भाबडे अडाणीपण यंत्रावर लादीत असते!

---

**46.** वरील उताऱ्यातून कोणती विचारधारा स्पष्ट होते ?

(a) मानवतावादी विचारधारा
(b) साम्यवादी विचारधारा
(c) यंत्रवादी विचारधारा
(d) समानतावादी विचारधारा

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) व (b) बरोबर (c) व (d) चूक
(2) (a), (b) व (d) बरोबर (c) फक्त चूक
(3) (b), (c) व (d) बरोबर (a) फक्त चूक
(4) सर्व पर्याय बरोबर आहेत.

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

**47.** वरील उतारा वाचून कोणता अचूक निष्कर्ष निघेल ? अचूक पर्याय निवडा.

(a) यंत्राला माणसाने दोष देवू नयेत.
(b) मनुष्याला सुख हवे तर यंत्रही हवेच.
(c) मनुष्य यंत्राचा गुलाम होईल.
(d) यंत्रामुळे उत्पन्न वाढेल.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) व (b) बरोबर (c) व (d) चूक
(2) (b) व (d) बरोबर (a) व (c) चूक
(3) (a), (b) व (c) बरोबर (d) फक्त चूक
(4) (a), (b) व (d) बरोबर (c) फक्त चूक

---

**48.** यंत्रामुळे मनुष्यामध्ये व समाजामध्ये कोणता बदल लेखकास अपेक्षित आहे ? अचूक पर्याय ओळखा.

(a) प्रत्येक मनुष्य चंगळवादी व ऐश्वर्यसंपन्न होईल.
(b) समाजातील विषमता कमी होईल.
(c) प्रत्येकाला समान संधी उपलब्ध होईल.
(d) मनुष्य आपल्या मनाप्रमाणे जगू शकेल.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) व (c) बरोबर (b) व (d) चूक
(2) (b) व (d) बरोबर (a) व (c) चूक
(3) (a), (b) व (d) बरोबर (c) फक्त चूक
(4) सर्व पर्याय बरोबर आहेत.

---

**49.** यंत्राच्या वापरामुळे मनुष्यास कोणता लाभ मिळेल असे लेखकास वाटते ?

(a) मनुष्यास सुख प्राप्त होईल.
(b) मनुष्याला काबाडकष्ट करावे लागणार नाहीत.
(c) मनुष्य अतिशय श्रीमंत होईल.
(d) मालक-नोकर भेद राहणार नाही.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) फक्त बरोबर बाकी सर्व चूक
(2) (b) व (d) बरोबर (a) व (c) चूक
(3) (a), (b) व (d) बरोबर (c) फक्त चूक
(4) सर्व पर्याय बरोबर आहेत.

---

**50.** यंत्रबळामुळे मनुष्याचे नेमके काय होईल असे लेखकास वाटते ?

(a) बेकारी वाढेल.
(b) मनुष्याचे काबाडकष्ट कमी होतील.
(c) माणसे इतरांकडून नागवली जातील.
(d) यंत्रामुळे मनुष्यास रिकामा वेळ मिळेल.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) व (c) बरोबर (b) व (d) चूक
(2) (b) व (d) बरोबर (a) व (c) चूक
(3) (a), (b) व (c) बरोबर (d) फक्त चूक
(4) सर्व पर्याय बरोबर आहेत.

---

**51.** 'None of us knew the way.'

The correct tag question corresponding to the sentence above is :

(1) Did we ? (2) Didn't we ?

(3) Did none ? (4) Didn't none ?

**52.** (a) He lives in Khurja in Bulandshahr.

(b) He has fallen into the river.

(c) Divide the property among all the brothers.

Identify the correct sentence/s.

**Answer options :**

(1) (a) and (b) Only (2) (b) and (c) Only

(3) (a) and (c) Only (4) (a) Only

**53.** Choose from the following the correct antonymous pairs.

(1) 'Base : Noble' and 'Float : Sink'

(2) 'Common : Extra' and 'Fresh : Stale'

(3) 'Acquit : Sacrifice' and 'Kind : Gentle'

(4) 'Grave : Rare' and 'Fat : Slim'

**54.** (i) Madhu <u>likes</u> Mangoes.

(ii) The old man <u>sat</u> in a corner.

The verbs underlined in the sentence (i) and (ii) above are ________ verbs respectively.

(a) transitive, transitive (b) transitive, intransitive

(c) intransitive, intransitive (d) intransitive, transitive

**Answer options :**

(1) (d) Only (2) (b) Only (3) (a) Only (4) (c) Only

**55.** He said to me, "please spare me your book for three days."

Select the correct indirect narration of the above sentence.

(1) He told to me spare my book for three days.

(2) He requested me to spare his book for three days.

(3) He suggested me to spare your book for three days.

(4) He requested me to spare my book for three days.

**56.** This would set the pattern for a generation.

Identify the correct meaning of the underlined.

(1) model (2) promotion (3) support (4) backing

---

**57.** Use of seatbelts in cars is now ________ (obligate).

Select the correct form of the word in the bracket to complete the sentence meaningfully.

(1) obligative (2) obligation (3) obligatory (4) obligating

---

**58.** Select the word similar in meaning of the following word from given alternatives :

'Perpetual'

(1) Partial (2) Peculiar (3) Predent (4) Permanent

---

**59.** Choose the correct sentence from the following alternatives.

(1) The Ceylon is to the south of India.

(2) Ceylon is to the south of India.

(3) Ceylon is to south of India.

(4) The Ceylon is to south of India.

---

**60.** (a) He is more a philosopher than a poet.

(b) Waste not, want not.

(c) We desire to reap therefore we sow.

Identify the complex sentence.

(1) (a) Only (2) (b) Only (3) (c) Only (4) (a) and (b) Only

---

**61.** Zenith is ________.

Select the correct option to complete the sentence.

(1) the line at which the earth's surface and the sky seem to meet

(2) the highest point in the sky reached by the sun or the moon

(3) an outer part/edge of an area

(4) a heavy base supporting a statue

---

**62.** Choose the correctly spelt underlined word from the options given below.

(a) The sun is <u>stationery</u>. (b) The sun is <u>stationiary</u>.

(c) The sun is <u>stationary</u>. (d) The sun is <u>stetionery</u>.

**Answer options :**

(1) (b) (2) (c) (3) (a) (4) (d)

---

**63.** Choose the correct option for the following phrase :

'That which cannot be read'

(1) illegible (2) indelible (3) incorrigible (4) invisible

---

**64.** She said to me, "Shall I return these notes by Monday ?"

The correct indirect narration corresponding to the sentence above is :

(1) She asked me if I should return those notes by Monday.

(2) She asked if she should return those notes by Monday.

(3) She asked me if she should return those notes by Monday.

(4) She asked me if she should return these notes by Monday.

---

**65.** Bad habits should be <u>destroyed in the beginning</u>.

Select the correct phrase for the underlined.

(1) nipped in the bud (2) got over immediately

(3) discouraged soon (4) disgraced instantly

---

**66.** 'When will you bring it ?'

Identify the correct passive voice of the above sentence.

(1) When will you be brought it ?

(2) When it will be being brought by you ?

(3) When will it be brought by you ?

(4) Whether will it be brought by you ?

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

67. The phrase which semantically substitutes the word – 'Misogynist' is :

(1) 'one who hates women.'

(2) 'one who hates mankind.'

(3) 'one who hates marriage.'

(4) 'one who looks at the dark side of things.'

---

68. 'We are going to discuss all the issues in detail.'

The form – 'be going to' underlined in the sentence above expresses :

(1) action in the near future.

(2) action in the uncertain future.

(3) forced action in future.

(4) probable action in future.

---

69. 'Valmiki is the Homer of India.'

The underlined proper noun in the sentence above has been used as a/an ________ noun.

(a) Common (b) Collective (c) Material (d) Abstract

**Answer options :**

(1) (d) Only (2) (c) Only (3) (a) Only (4) (b) Only

---

70. ________ your income before spending it recklessly.

Complete the sentence choosing the correct option.

(1) Cast out (2) Cast up (3) Cast about (4) Cast off

---

71. The word which means – 'Notice of death, especially in a newspaper' is :

(1) Sojourn (2) Summons (3) Obituary (4) Exile

---

72. What is the meaning of 'To blow one's own trumpet' ?

(1) to praise oneself

(2) to blow a trumpet at a programme

(3) to accompany a band of musicians

(4) to enjoy oneself

---

**73.** The word which means – 'notorious' is spelt correctly as ________.

(1) Errant (2) Errand (3) Arrant (4) Arrand

---

**74.** They were working <u>hand in glove</u> with the authorities.

Identify the correct meaning of the underlined.

(1) in co-operation (2) within reach

(3) in control (4) indifferently

---

**75.** 'He <u>gave out</u> that he was soon going to Canada.'

The phrase underlined in the sentence above means :

(1) announced (2) admitted

(3) shared the news (4) suggested

---

**76.** 'If I had money, I might go in for a new car.'

The sentence above expresses a/an ________ condition.

(1) Impossible (2) Probable (3) Improbable (4) General Truth

---

**77.** Identify the following sentence punctuated correctly.

The Prince asked why are you so sorrowful.

(1) The Prince asked, "Why are you so sorrowful!"

(2) The Prince asked, "Why are you so sorrowful ?"

(3) The Prince asked – Why are you so sorrowful ?

(4) The Prince asked, "why are you so sorrowful!"

---

**78.** All his efforts to win over his adversary have <u>ended in smoke</u>.

Select the correct meaning of the underlined.

(1) destroyed by smoke

(2) ended in nothing

(3) became reason for rumour

(4) ended in darkness

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

**79.** 'He doesn't have college education, still he makes more money than most graduates.'

The sentence connector underlined in the sentence above expresses :

(1) Consequence (2) Addition (3) Contrast (4) Conclusion

---

**80.** Mary was the rightful successor to the English throne.

Select the correct antonym for the underlined.

(1) inheritor (2) predecessor (3) agitator (4) supporter

---

**81.** (a) Wise enemy is better than foolish friend.

(b) Houses are made of the brick and the cement.

(c) Honesty is the best policy.

Identify the correct sentence/s.

**Answer options :**

(1) (a) Only (2) (b) and (c) Only (3) (b) Only (4) (c) Only

---

**82.** Select the correctly punctuated sentence from the following alternatives.

(1) How many r's are there in 'referred' I asked.

(2) "How many r's are there in 'referred'?" I asked.

(3) "How many rs are there in 'referred'? I asked.

(4) How many r's are there in 'referred', I asked.

---

**83.** The meaning – 'Property inherited from one's father or ancestors' is substituted correctly by the word :

(1) Alimony (2) Hereditary (3) Patrimony (4) Matrimony

---

**84.** 'The noun, pronoun or noun phrase which follows a/an ________ verb is called its object.'

(1) Intransitive (2) Transitive (3) Strong (4) Weak

---

**85.** She handed me a bunch of flowers.

Select the correct passive voice of the above.

(a) A bunch of flowers was handed to me.

(b) I was handed a bunch of flowers by her.

(c) A bunch of flowers were handed to me.

(d) I have been handed a bunch of flowers.

**Answer options :**

(1) (a) and (b) Only (2) (c) Only (3) (d) Only (4) (b) Only

---

**86.** The correct suffixes to form Diminutives from the words – 'Book' and 'Weak' respectively are :

(1) '-y' and '-en' (2) '-er' and '-ade'

(3) '-ish' and '-ness' (4) '-let' and '-ling'

---

**87.** Identify the correct sentences.

(a) The girl which is standing near the counter is a television actress.

(b) The table which we bought yesterday is made of teak wood.

(c) The gentleman who came in the morning has left a note for you.

**Answer options :**

(1) (c) only (2) (a) and (b) only

(3) (b) and (c) only (4) (a), (b) and (c)

---

**88.** Choose the word group spelt correctly.

(1) drought, restaurent, accessible, gaurantee

(2) truely, brevity, achive, neighbour

(3) light, fight, hight, might

(4) amateur, tentative, contingency, summariz(s)e

---

**89.** Choose the grammatically correct sentence from the alternatives given below.

(1) My sister is cooking dinner every evening.

(2) My sister was cooking dinner every evening.

(3) My sister have been cooking dinner every evening.

(4) My sister cooks dinner every evening.

---

**90.** Match the following words with their synonyms.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Renown | (i) | Cunning |
| (b) | Shrewd | (ii) | Harsh |
| (c) | Transient | (iii) | Brief |
| (d) | Stern | (iv) | Fame |

**Answer options :**

(1) (a)-(iv), (b)-(iii), (c)-(ii), (d)-(i)
(2) (a)-(ii), (b)-(iv), (c)-(iii), (d)-(i)
(3) (a)-(iv), (b)-(i), (c)-(iii), (d)-(ii)
(4) (a)-(i), (b)-(ii), (c)-(iii), (d)-(iv)

---

**91.** Identify from the following the affirmative sentence with the correct word order or sequence.

(a) Let's open the window.
(b) Let's open not the window.
(c) Let the window to open.
(d) We shall open the window to let.

**Answer options :**

(1) (c) Only (2) (a) Only (3) (b) Only (4) (d) Only

---

**92.** Choose the word from the following that is opposite in meaning of the word – "lively".

(1) dull (2) opaque (3) unclear (4) unreal

---

**93.** Choose from the following the correct words which semantically match the words.
- 'Norm', 'Quake' and 'Relate' respectively :

(1) 'Standard', 'Shake' and 'Tell'
(2) 'Rule', 'Shake' and 'Connect'
(3) 'Standard', 'Shake' and 'Recall'
(4) 'Standard', 'Quick' and 'Narrate'

---

**94.** How many subordinate clauses are present in the given sentence ?
'I feel that he will come here if we send him the money.'

(1) four (2) one (3) three (4) two

---

**95.** Children screamed in horror.
Identify the correct meaning of the underlined item in the given context.

(1) delight (2) atrocity (3) terror (4) appeal

---

**Read the following passage carefully and answer the questions from 96 to 100.**

In recent times, India has grown fast not only compared to its own past but also in comparison with other nations. But there cannot be any room for complacency because it is possible for Indian economy to develop even faster and also to spread the benefits of this growth more widely than has been done so far. We are not considering the kinds of micro-structural changes that we need to conceptualize and to implement but elaborating the idea of inclusive growth that constitutes the defining concept behind this Government's various economic policies and decisions. A nation interested in inclusive growth views the same growth differently depending on whether the gains of the growth are heaped primarily on a small segment or shared widely by the population. The latter is cause for celebration but not the former. In other words, growth must not be treated as an end in itself but as an instrument for spreading prosperity to all.

India's own past experience and the experience of the other nations suggests that growth is necessary for eradicating poverty but it is not a sufficient condition. In other words, policies for promoting growth need to be complemented with policies to ensure that more and more people join in the growth process and further, that there are mechanisms in place to redistribute some of the gains to those who are unable to partake in the market process and hence, get left behind.

A simple way of giving this idea of inclusive growth a sharper form is to measure a nation's progress in terms of the progress of its poorest segment (the bottom 20 *per cent* of the population). One could measure the *per capita* income of the bottom quintile of the population and also calculate the growth rate of income and evaluate our economic success in terms of these measures that pertain to the poorest segment. This approach is attractive because it does not ignore growth like some of the older heterodox criteria did. It simply looks at the growth of income of the poorest sections of the population. It also ensures that those who are outside of the bottom quintile do not get ignored. If that were done, then those people would in all likelihood drop down into the bottom quintile and so would automatically become a direct target of our policies. Hence, the criterion suggested here is a statistical summing up of the idea of inclusive growth which, in turn, leads to two corollaries: to wish that India must strive to achieve high growth and that we must work to ensure that the weakest segments benefit from the growth.

---

**96.** The idea of inclusive growth is very significant as :

(1) it heaps the gains of growth primarily on a small segment of the country.

(2) it reflects the Government's various economic policies and decisions.

(3) it helps the Government to remind/to recall its past.

(4) it does not ignore the older heterodox criteria of growth measurement.

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

**97.** "The latter is cause for celebration but not the former."

The statement occurring in the passage means :

(1) The inclusive growth must be an instrument and not an end in itself.

(2) The new criteria for measuring inclusive growth are better than the older heterodox criteria.

(3) The poor segment of the country is the real claimant of growth and not a small rich segment of population.

(4) The benefits of growth are shared widely by the population and not given to a small segment only.

---

**98.** The underlying argument in the passage is a plea for :

(1) micro-structural changes in the Government's policies.

(2) real inclusive growth in the country.

(3) redefining the new criteria for nation's economic growth.

(4) achieving faster growth than in the past.

---

**99.** It is essential on the part of the Government :

(1) to always remember its past performance.

(2) to devise mechanism/s to redistribute gains to those left out of market process.

(3) to compare its growth to the growth of other nations.

(4) to promote micro-structural changes in its policies and decisions.

---

**100.** In the light of the argument in the passage, the true statement/s is/are :

(a) The idea of inclusive growth takes note of the growth in the income of the poorest sections of the population.

(b) A nation's progress can truly be measured in terms of the progress of its poorest segment.

(c) The faster development of Indian economy is feasible.

(d) The progress of the poorest segment (20% of population) can be measured in terms of growth in per capita income of the segment.

**Answer options :**

(1) (d) Only
(2) (a), (b), (c) and (d)
(3) (c) Only
(4) (a) and (b) Only

- o O o -

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

**सूचना — (पृष्ठ 1 वरून पुढे.....)**

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) सदर प्रश्नपुस्तिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वतःबरोबर परीक्षा कक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. **मात्र परीक्षा कक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग-1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

---

## नमुना प्रश्न

प्र. क्र. 201. "अंगावर काटा उभा रहाणे" या वाक्यप्रचाराचा अर्थ काय ?

(1) अंग शहारणे (2) रोमांचित होणे

(3) अतिशय भिती वाटणे (4) बहरुन येणे

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर "(3) अतिशय भिती वाटणे" असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर "(3)" होईल. यास्तव खालीलप्रमाणे प्रश्न क्र. 201 समोरील उत्तर-क्रमांक "③" हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखविणे आवश्यक आहे.

प्र. क्र. 201. ① ② ● ④

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तर-क्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्न-क्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**